# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय अर्थसंकल्पीय महासभा क्रमांक ३

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **मंगळवार दिनांक २७/०२/२०२४ सकाळी ११-०० वाजता स्व.अटलबिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | डॉ.संगीता नांदूरकर | उपायुक्त |
| ४. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ५. | श्री.हेमंत निकम | उपायुक्त |
| ६. | श्री.गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ७. | श्री.सुनिलकुमार सुर्यवंशी | प्र. मुख्य लेखा परिक्षक |
| ८. | श्रीमती पल्लवी शिरसाठ | मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी |
| ९. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| १०. | श्री.विनोद मोरे | नगररचनाकार |
| ११. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| १२. | श्री.कैलास शिंदे | अभियंता |
| १३. | श्री. एन. के. बागुल | शाखा अभियंता |
| १४. | श्री.सी. एम. उगले | सहा.अभियंता,पा.पु.वि. |
| १५. | श्री.पी.डी.चव्हाण | सहा.अभियंता, बां.वि. |
| १६. | डॉ. एम.आर.शेख | आरोग्याधिकारी |
| १७. | श्री.राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १८. | श्री. किशोर सुडके | परवाना विभाग / बाजार विभाग |
| १९. | श्री.चंद्रकांत मोरे | प्र.लेखापाल |
| २०. | श्री.संजय मोरे | कार्यालयीन अधीक्षक,आस्थापना विभाग |
| २१. | श्री.राजेंद्र माईनकर | प्र.भांडारपाल |
| २२. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २३. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |
| २४. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |

| | | |
|---|---|---|
| २५. | श्री.राजेश गायकवाड | लेखापाल,शिक्षण मंडळ |
| २६. | श्री.संभाजी सुडके | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २७. | श्री.अतुल पाटील | लिडींग फायरमन |
| २८. | श्री.गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |
| २९. | श्री.रविकिरण पाटकरी | वृक्ष समिती प्रमुख |
| ३०. | श्रीमती मीना सातभाई | महिला व बालकल्याण विभाग |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

## सदर बैठकीत पारीत झालेले ठराव व प्रस्ताव

---

**प्रशासक ठराव क्र.१९** **दिनांक:-२७/०२/२०२४**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/जाहिरात/९२ दि.२०/०१/२०२४

विषय क्रमांक:-१९ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अन्वये धुळे महानगरपालिकेचे सन २०२३-२४ चे सुधारीत व सन २०२४-२५ चे मुळे अंदाजपत्रकास (मा.स्थायी समिती) / मा.प्रशासक ठराव क्रमांक ३८ दिनांक २०/०२/२४ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. सदर अंदाजपत्रक (मा.महासभा)/मा.प्रशासक यांचे मान्यतेसाठी आलेले असून त्यावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व मा.आयुक्त यांचा ०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अन्वये धुळे महानगरपालिकेचे सन २०२३-२४ चे सुधारित व सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकास (मा.स्थायी समिती)/ मा.प्रशासक ठराव क्रमांक ३८ दिनांक २०/०२/२०२४ अन्वये मे.महासभेपुढे सादर करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

सन २०२३-२४ चे सुधारीत व सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकातील जमा व खर्चांच्या प्रत्येकबाबीवर अभ्यास करून तसेच विचार विनियम करून खालीलप्रमाणे सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात दुरूस्ती/ सुधारणा करून अंतिम करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच खालील नमूद केलेल्या बाबीसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांत दर्शविण्यात आलेली तरतूद ही प्राथमिक स्वरूपाची तरतूद असून संबंधित विभागांनी याबाबत डिसेंबर अखेर प्रत्यक्ष होणाऱ्या

रक्कमेचे पुर्नविनियोजन अथवा पुरक मागणी करून सुधारीत अंदाजपत्रकात करून घेणे आवश्यक असेल या अटीवर खालील नमूद तरतूदी करण्यात येत आहे.

**भांडवली जमा बाजू**

| अ.क्र. | लेखाशिर्षक | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | मे.महासभेने सुचविलेल्या शिफारशी | वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | जमीन विकास शुल्क | ७.६४ | १२.६४ | ५.०० |

**भांडवली खर्च बाजू**

| अ.क्र. | लेखाशिर्षक | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | मे.महासभाने सुचविलेल्या शिफारशी | वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | जमीन विकास शुल्क अंतर्गत कामे | ७.६७ | १२.६४ | ५.०० |
| २ | मनपामार्फत कचऱ्यावर प्रक्रिया करणे | ४.०८ | ०.०८ | -४.०० |
| ३ | प्रशासक निधी (अत्यावश्यक कामे) | ०.०० | ४.०० | ४.०० |
| ४ | नवीन पाईपलाईन टाकणे. | ०.५० | ०.८५ | ०.३५ |

प्रशासनामार्फत सादर केलेल्या सुचना लक्षात घेवून तसेच स्थायी समितीने मान्यता दिल्यानुसार व मनपा उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ करुन सन २०२३-२४ चे रक्कम रूपये ६७५.३३ कोटीचे सुधारीत व सन २०२४-२५ चे रक्कम रूपये १७३३.१३ कोटीचे मुळ अंदाजपत्रक तसेच वृक्ष प्राधिकरण समितीचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**सही/-x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**